| | | |
|---|---|---|
| 7 | महाराष्ट्रातील प्रारंभीक संघटनांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानद बॉम्बे असोशिएशन<br>फावडे पृथ्वी बालाजी | 23 |

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2022

(CCCLXXII) 372-C

## Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

**Editor**
Dr. Subhash G. Benjalwar
Head, Department of History,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**Impact Factor – 8.575** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## October -2022

**ISSUE No - (CCCLXXII) 372-C**

## Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. M.N. Kolpuke**
Principal,
Executive-Editors
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga Dist. Latur

**Dr. Subhash G. Benjalwar**
Editors
Head, Department of History Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Revolutionary Movement in Maharashtra and Indian Freedom Struggle | Dr. Nitin Bawale | 1 |
| 2 | Sardar Vallabhbhai Patel &Integration of Hyderabad Princely State | Mahesh S Jadhav | 4 |
| 3 | Role of Press In Indian Freedom Struggle | Shubham Devrao Kedar | 7 |
| 4 | Contribution Of Revolutionary Movement Of Maharashtra In Ihe Indian Freedom Fight | Prof. Dr. Rajkumar S. Kamble | 11 |
| 5 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव - विशेष संदर्भ मराठवाडा | डॉ.बी.के.शेप | 15 |
| 6 | खान्देशातील आडगाव येथील स्वातंत्र्य सैनिकांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | डॉ. बालाजी विठ्ठलराव पवार & डॉ. मीना नामदेवराव काळे | 18 |
| 7 | महाराष्ट्रातील प्रारंभीक संघटनांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदानद बॉम्बे असोशिएशन | फावडे पृथ्वी बालाजी | 23 |
| 8 | महाराष्ट्रातील वृत्तपत्रे, साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | डॉ. मधुकर बैकरे | 25 |
| 9 | महाराष्ट्रातील महिलांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | रत्नमाला सिताराम वेलदोडे | 30 |
| 10 | सन १९४२ च्या लढ्यातील कोल्हापूर जिल्ह्याचे योगदान | प्रा. डॉ. नरेंद्र बी. देशमुख | 33 |
| 11 | भारतीय स्वातंत्र्य लढा आणि महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे योगदान. | डॉ. सुनिल चंदर सोनकांबळे | 36 |
| 12 | भारतीय राष्ट्रीय अंदोलनात लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे योगदान | प्रा.हंबीर राजू मारोती | 40 |
| 13 | महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीचे, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | प्रा.डॉ.एस.जी. शिंदे | 43 |
| 14 | हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि महाराष्ट्र परिषद | डॉ.सचिन उत्तमराव हंचाटे | 47 |
| 15 | हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यसंग्राम व भारतीय स्वातंत्र्यलढा | प्रा.व्यंकट संदिपान बिरादार | 52 |
| 16 | महाराष्ट्रातील प्रमुख क्रांतिकारक व त्यांचे भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान | प्रा.डॉ.शिवाजी मुळे | 55 |
| 17 | 'मराठवाडा मुक्ती संग्राम आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ' | प्रा. डॉ. दशरथ किसन रसाळ | 60 |
| 18 | मराठवाडा मुक्तिसंग्रामात ब्याड कॅम्पचे योगदान | प्रा. डॉ. धीरजकुमार नजान | 64 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, (CCCLXXII) 372 - C
ISSN : 2278-9308
October, 2022

# महाराष्ट्रातील प्रारंभीक संघटनांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान द बॉम्बे असोशिएशन

**फावडे पृथ्वी बालाजी**
(अर्थशास्त्र विभाग) महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

२६ ऑगस्ट१८५२ रोजी मुंबई येथ्रे शहरातील सर्व जातीचे, धर्माचे आणि भाषांचे प्रतिष्ठिाण नागरिक एकत्र आले.या सभेचे अक्ष्यक्ष नाना ऊर्फ जगन्नाथ्र शंकरशेठहेहोते.त्यांच्या अक्ष्यक्षतेखाली झालेल्या या सभेत द बॉम्बे आसोशिएशन ही राजकीयसंघटना स्थापन झाली.या संघटनेच्या स्थापनेसाठी दादाभाई नौरोजी यांनी पूढाकार घेतला.त्यांनीहीसंघटना स्थापन करताना महत्वाचे भाषण केलेहोते. तेव्हापासूनच त्यांच्या राजकीय जीवनाला प्रारंभ
झाला.

डॉ.भाऊ दाजी लाडहे द बॉम्बे असोशिएशन या संघटनेचे चिटणीसहोते.ती जगन्नाथ शंकरशेठ यांनीसंघटनेचेकाही वर्ष उपाध्यक्ष व काही वर्ष अध्यक्ष पद भूषविले.या संघनेची सदस्यसंख्या ७५ होती.यापैकी अर्ध्यापेक्षा आधिकसदस्य पारसीहोते.बोमनजी ,होरसनजी, फर्दुनजी नौरजी, जमशेटजी, जिजीभाई, विनायकराव जगन्नाथ, माणिकजीकर्सेटजी आणि वि. ना मंडलिक प्रमुख नेत्यांनी असोसिएशनला प्रबळ बनविले.डॉ.भाऊ लाड यांच्यानंतर विनायक जगन्नाथ यांनी चटणीस म्हणूनकामकेले.

**उद्देश :**

१) ज्या सभेत ही असोशिएशन स्थापना झाली, त्या सभेचे अध्यक्ष जगन्नाथ शंकरशेठ होते.त्यांनी अध्यक्षीय भाषणात असाशिएशनचा उद्देश सांगताना असे म्हटलेकी, मुंबई प्रात सरकारच्या अंमलाखाली जे एनददेशीय शहरात यांच्या अनुमतीची किंवा गरजांची चौकशीकरणे आणि देशाचीसुधारणाकरण्यासकोणते उपाय आवश्यक आहे. हेसरकारला कळविणे हा या असोशिएशनच्या उद्देश आणि सभेचा मुख्य उद्देश आहे.

२) जगन्नाथ शंकरशेठ यांनी असोशिएशनचा दुसरा उद्देश सांगताना असे म्हटले आहेकी, या देशातील जनतेचे कल्याण करावे अशी इग्रज सरकारची इच्छा आहे, पण आमची अशी काही दु:खे आहेत की ती सरकारच्या नजरेस येत नाहीत. त्यामुळेही सरकारच्या नजरेस आणून द्यावीत आणि रयतेच्या सुखासाठी सरकारला सर्व प्रकारचेसहाय्य करावे यासाठीचही आसोशिएशन स्थापन केली आहे.

३) भारतातील लोकांच्या आडचणी आणि त्यांचे प्रश्न सरकारपुढे सादर करुन त्यावर उपाययोजना करणे.

४) देशातील रयतेचेकल्याण करणे.

५) बॉम्बे गॅझेटयासारखी इंग्रजी वृत्तपत्रे मात्र सरकारला विरोध करण्यासाठीच असोशिएशनची स्थापना झाली असे आरोप करीत होती.

**असोशिएशनची काय:**

**१) कंपनीच्या धोरणावर टिकाकरणे :**

ब्रिटीश ईस्ट इंडियाकंपनीने भारतावर इ.स १७५७ पासून इ.स १८५७ पर्यत राज्य केले.या काळातकंपनीचे भारतीय जनतेच्या हिताचा विचार न करता स्वहित आणि विकासासाच विचार केला आणि त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले.कंपनीने भारताचे आर्थिक शोषण करण्यावर आधिकभर दिलाहोता.त्यामुळे असोशिएशनने इ.स १८५३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटला एक निवेदन सादरकेले.या निवेदनात असोशिएशने चिटणीस डॉ.भाऊ दाजी लाड यांनीकंपनीच्या धोरणावर टीकाकेली.या निवेदनात विविध मागण्या करण्यात आल्या कंपनीसरकारचे पक्षपती धोरण, उधळपट्टी धोरण आणि अन्यायी राज्यकारभारावरही निवेदनात प्रकाश टाकलाहोता. या निवेदनावर पुणे, मुंबई, आणि ठाणे येथील ३००० लोकांच्या सह्या होत्या या निवेदनाच्या शेकडो प्रति तयार करुन त्या इंग्लंडमधील प्रमुख वृत्तपत्रांना पाठविल्या हे निवेदन म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील पाहिले पान ठरते. सन १८५३ मध्येकंपनीचे नूतनीकरण झाले.नंतर असोशिएशनचेकार्यथंडावले.

**२) १८५७ चा उठाव व असोशिएशन :**

१८५७ च्या उठावाच्या वार्ता मुंबईत धडकल्या मीरतचीकत्तल, दिल्लीची नाकेबंदी व क्रांतीकारकांनी दिल्लीवर घेतलेला ताबा या सर्व घटनांमुळे मुंबईतील इंग्रजी राज्यकर्त्यांचे धाबे दणावले. उठावाचे लोण मुंबईत आले.तर आपल्या हितसंबधाना बाधा येईल अशी भिती वाटत होती अगदीयाचप्रमाणे उठावामुळे आपल्या हितसंबंधाला धोका निर्माण होईल आणि आपला व्यापारही संपेल अशीही भिती मुंबईच्या जीवनात अग्रेसर आसलेल्या व इंग्रजांच्या स्तुतीस पात्र ठरलेल्या मुंबईकरानी भराभर सभा घेतल्या व अशा सभातून उठावातील शुरसैनिकांची नींदाकेली. त्यांनी इंग्रजांचीस्तुतीकेली. आपण इंग्रज राज्यात सुखीअसुन इमानी नागरिक म्हणून राहू इच्छितो. आशाप्रकारचे विनंती अर्ज नागरिकांनी मुंबईचे तात्कालीन गर्व्हनर एलकिस्टन यांना पाठविले. पहिला अर्ज

१५ जून १८५७ रोजी मुंबईतील ज्यू लोकांनी पाठविला.या अर्जवर दाविद ससून व मोसेस गुबे या श्रीमंत नागरिकांनी मुंबईत सरकारला अर्ज दिला.या अर्जवर ५०० बहूजन नागरिकांच्या सह्या होत्या.यात प्रामुख्याने डॉ.भाऊ दाजी लाड, आबाजी बापूजी, नारायण दाजी नवरोजी कामजी, कावसजी जहांगीर, कावसजी जमशेटजी व काझी अहमद यूसूफ यांच्या सह्या होत्या.मुंबईत उठाव झाल्यास शांतता व सुव्यवस्थेसाठी वाटेल तीमदतसरकारलाकरण्याचे आश्वासन वरील दोन्ही अर्जात देण्यात आले.२३ जून १८५७ रोजी अशाच प्रकारचा अर्ज द बॉम्बे असोशिएशनने मुंबईत प्रांताच्या गर्व्हरकडे पाठविला.मुंबईत उठाव झाल्यास शांततेसाठीसरकारलासहकार्यकरण्याचे आश्वासन असोशिएशननेसरकारला दिले.

**३) कायदेमंडळात प्रतिनिधीत्वासाठी प्रयत्न :**

द बॉम्बे असोशिएशन या संघटने भारतीय लोकांना कायदेमंळात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी सतत प्रयत्न केले.त्यासाठी सरकारला तगादा लावला.शेवटी सरकारने इ.स १८६१ मध्ये भारतीय लोकांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व देण्याचे मान्य केले.मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळाचे पहिले सदस्य होण्याचा मान असोशिएशन अध्यक्ष जगन्नाथ शंकरशेठ यांना मिळाला.लोकाच्या वतीने सरकारशी बोलणारे आणि मध्यस्तीकरणारे मुंबईतील पाहिले पूढारी म्हणजे बॉम्बे असोशिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शंकरशेठहेहोते.

**४) सरकारचा निषेध : १८५९**

इ. स १८५९ मध्ये ब्रिटीश सरकारने व्यापारी आणि व्यावसायिकांवर कर बसविला.यावेळी असोशिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शंकरशेठ यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांनी आणि आसोशिएशनचे सचिव डॉ.भाऊ दाजी लाड यांच्या नेतृत्वाखाली व्यावसायिकांनी ब्रिटीश संसदेकडे असोशिएशन तर्फे वेगवेगळे अर्ज करुन भारतातील सरकारचा विरोध केला.व्यापरी आणि व्यावसायिकांचे प्रश्न सरकारकडे सादर करण्याचे आणि ते सोडविण्याचे प्रयत्न बॉम्बे असोशिएनने केले.

**५) असोशिएशनचा विकास :**

बॉम्बे असोशिएशनमध्ये अनेक प्रमुख्य नेते असल्याने तिच्या कार्याला बळकटी आली.दादाभाई नौरजी व फर्दुनजी नौरोजी यांनीसंस्थेलागतिशीलता ठेवण्याचे कार्यकेले.ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या फायनान्स कमिटी मुळे साक्ष देण्यास फर्दुनजीची नियुक्ती झाली होती.या संघटनेत अठरापगडा जातीचे मंडळी होती.त्या सर्वांनी असोशिएशनला प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला.

**६) असोशिएशनच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न :**

सुरुवातीच्या काळात बॉम्बे असोशिएशनने भरीव स्वरुपाचे कार्यकेले. नंतर मात्र या संघटनेत मरगळ आली.इ.स १८६५ मध्येहीसंघटना नावालाच शिल्लक राहिली होती. या संघटनेचे पुनरूज्जीवन करायचेकी, नवी संघटना काढावयाची या संदर्भात विश्वनाथ मांडलिक यांनी त्यांच्या मित्राशी चर्चाही केली होती. बॉम्बे असोशिएशन हीसंघटना आता गतप्राण झाली असुन तिच्या जागी नवीन संघटना स्थापन करण्याचा सल्ला त्यांच्या मित्रानी विश्वनाथ मंडलिक यांना दिला. पण मंडलिक यांनी मित्रांच्या सल्ला विचारत न घेता सभा भरवून बॉम्बे असोशिएशनचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला.

**७) मुलकी सेवेत भारतीयांना प्रवेश :**

सनदी मुलकी सेवेत भारतीय लोकांनासरकारने प्रवेश नाकारलाहोता.बॉम्बे असोशिएशनने मात्र भारतीय लोकाना सनदी मुलकी सेवेत प्रवेश देण्यात यावा यासाठी प्रयत्न केले. असोशिएशनच्या वत्तीने याबाबत एक अर्ज सुद्धासरकारला दिलाहोता.

**समारोप :**

द बॉम्बे असोशिएशन ही महाराष्ट्रातील राजकीय संस्था म्हणून स्थापन झाली असून तिने सुरुवातीच्या काळात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.भारतातील लोकांच्या अडचणी आणि त्यांचे प्रश्न सरकारकडेसादर करुन त्यावर उपाय योजनाकेल्या.या सर्व कार्यामूळे भारताच्या स्वातंत्र्यचळवळीला योगदान मिळाले.

**संदर्भ ग्रंथ ;**

१. कटारेआनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

२.गाटाळ एस. एस, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

३.ग्रोवर आणि बेलेकर, आधुनिक भारताचा इतिहास

We the Research Organization will do provide help for the following works listed below.

*Support for Arts, Commerce & Science all Disciplines*

- Research Paper Publication
- Book Chapters for Publications
- ISBN Publications Supports
- M.Phil Dissertations Publish
- Ph.D. Thesis in Book Format
- ISSN Journals with Impact Factor
- Online Book Publication
- Seminar Special Issues
- Conference Proceedings

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**Mobile : 9595560278 /**

Aadhar Publications

For Details www.aadharsocial.com

New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College, Amravati ( M.S ) India Pin- 444604

, Mob-- 9595560278, Emial: aadharpublication@gmail.com

Price:Rs.500/

issn 2278-9308

Maharashtra Shikshan Samiti, Nilanga's

# MAHARASHTRA MAHAVIDYALAYA, NILANGA

Tq. Nilanga Dist. Latur (MS) 413521

Indian Council of Social Science Research

Azadi Ka Amrit Mahotsav

## Department of History

Organized

**One Day National Seminar**

Under the Theme of

*Azadi Ka Amrit Mahotsav*

On

## "Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle"

Sponsored by

***Indian Council of Social Science Research (ICSSR), New Delhi***

**On**

**01st October, 2022**

# Certificate

This is to certify that, Prof./Dr./Mr./Miss. Phawade Prathvi Balaji

of M. M. Nilanga has actively participated in One Day National Seminar on "Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle" sponsored by Indian Council of Social Science Research, New Delhi on 01/10/2022 and presented his/her research paper entitled Swatantra chalvatil Maharashtratil Praramblik santhanche yogdan

Hence Certified.

| | | |
|---|---|---|
| Dr. B.S. Gaikwad | Dr. S. G. Benjalwar | Dr. M. N. Kolpuke |
| Coordinator, Azadi ka Amrit mahotsav Samiti | Convener & Head, Department of History | Principal & Chief Organizer |
| Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | Maharashtra Mahavidyalaya, Nilanga |